## पान १ वरून

### भरधाव मालट्रकखाली ...

भरधाव वेगाने जाणारा १६ चाकी ट्रक (एमएच-५०-एन-४७५७) रस्त्यावर वाहनाची वाट पाहत बसलेल्या महिला मजुरांना चिरडत पुढे गेला. हा अपघात इतका भयानक होता की, एका महिलेचा टायरमध्ये अडकून मृत्यू झाला, तर उर्वरित पाच महिला या एकमेकींपासून वीस ते तीस फुटाच्या अंतरावर फरफटत मृत्युमुखी पडल्या. अपघात घडताच जोराचा आवाज होऊन गोंधळ उडाला. स्थानिक तरुणांनी मदतकार्य हाती घेतले. मालट्रक चालक सुरज रामचंद्र वीर यास पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. अपघाताची माहिती मिळताच मंगळवेढा ग्रामीण पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक भगवानराव खणदाळे यांनी घटनास्थळी भेट दिली.

**महिलांना उपचारासाठी नेण्यास विलंब**

अपघाताच्या ठिकाणी मोठी गर्दी झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अपघातस्थळी दाखल झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी जखमी झालेल्या दोन महिलांच्या उपचाराची व्यवस्था करण्याकडे दुर्लक्ष करून ट्रकच्या चालकास संरक्षण दिल्याचा आरोप करीत या पोलीस कर्मचाऱ्यास निलंबित करावे, असा आरोप मृतांच्या नातेवाईकांनी केला.

### २० हजार कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात

जनता जनार्दनाला मी प्रणाम करतो. बाबा विश्वनाथ व गंगा मातेच्या अशीर्वादाने व काशीवासीयांच्या अपार स्नेहामुळे मला तिसऱ्यांदा देशाचा प्रधानसेवक बनण्याचा बहुमान मिळाला आहे. आता गंगा मातेने जणूकाही मला दत्तक घेतले असून, मी वाराणसीचा झाल्याचे वाटत असल्याची भावना मोदींनी व्यक्त केली. लोकसभा निवडणुकीमुळे देशाच्या लोकशाहीचे विशाल स्वरूप, सामर्थ्य तथा व्यापकता आणि भारतात लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजली गेल्याचे दर्शन जगाला घडले. लोकसभा निवडणुकीत जनतेने दिलेला कौल खरोखरच अभूतपूर्व आहे. यामुळे इतिहास घडला आहे. आमच्या सरकारने शेतकरी आणि गरिबांच्या हिताचा पहिला निर्णय घेतला आहे.

देशातील शेतकरी, महिला, युवक व गरीब हे विकसित भारताचे स्तंभ आहेत.

दरम्यान, वाराणसी लोकसभा मतदारसंघातून नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. यंदा त्यांनी १ लाख ५१ हजारांच्या मताधिक्याने बाजी मारली. त्यानंतर, वाराणसीत मोदी आले असता त्यांनी ५० हजार शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मोदींनी दशाश्वमेध घाटावर जाऊन गंगा आरती केली. काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन त्यांनी पूजाअर्चा केली.

### देशातील ४१ विमानतळांना...

धमकी मिळाली होती. ताज्या ई-मेलमध्ये नागपूरशिवाय दिल्ली, पाटणा, जयपूर आणि चेन्नईसह ४१ विमानतळांना उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. त्यामुळे या विमानतळांवर देखील सुरक्षा दलांकडून कसून झाडाझडती घेण्यात आली. पण तपासात काहीही हाती लागले नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. चेन्नईमधील विमानतळाहून दुबईकडे जाणाऱ्या विमानात बॉम्ब ठेवण्यात आल्याची धमकी मिळाली होती. तर दिल्ली विमानतळावर देखील दिल्लीहून दुबईला जाणाऱ्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी देण्यात आली होती.

जयपूरमधील विमानतळाबरोबरच एसएसजी पारीक पदव्युत्तर महाविद्यालयाला देखील बॉम्बस्फोटाने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर भीतीचे वातावरण पसरले होते. पण तपासात काहीही आढळले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. धमकीचे ई-मेल पाठवणाऱ्यांचा शोध घेतला जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. पण गत काही कालावधीपासून विमानतळ, शाळा आणि महाविद्यालयांना अशा प्रकारच्या धमक्या मिळत असल्याने सुरक्षा यंत्रणेसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.


सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India CENTRAL TO YOU SINCE 1911

चन्दरमुखी, नरीमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
फोन : ०२२-६६३८७६८०,
वेबसाईट : www.centralbankofindia.co.in

**सफाई कर्मचारी सह उप-कर्मचारी आणि/किंवा उप-कर्मचारी २०२४-२५ ची भरतीसाठीच्या जाहिरातीचे शुद्धीपत्रक**

१६.०६.२०२४ च्या **(पुण्यनगरीच्या महाराष्ट्र आवृत्ती)** वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या जाहिरातीमध्ये, बँकेचे व्यवसाय आकडे कृपया **₹७,००,०००.०० कोटींपेक्षा जास्त' ऐवजी ₹६,००,०००.०० कोटींहून अधिक म्हणून वाचावेत.**

**मुंबई, दिनांक : १८/०६/२०२४** **महाप्रबंधक (मासंप्र)**



Gramin Samajsevi Sanstha's

**DR. KOLPE INSTITUTE OF PHARMACY**

A/p - Kolpewadi, Tal - Kopargaon, Dist - Ahmednagar. Pin - 423 602, Maharashtra
Ph. No. (02423) 261812, 262249, 295813 Mob. No. 9890641886
President :- Dr. Prakash J. Kolpe Email: drkolpepharmacy@gmail.com
Approved By Pharmacy Council of India, New Delhi; DTE, Mumbai & recognized by Govt. of Maharashtra, Affiliated to MSBTE, Mumbai & DBATU, Lonere DTE Code:- 5460, MSBTE Code:- 1871

**RECRUITMENT**

Gramin Samajsevi Sanstha, Sanchalit Dr. Kolpe Institute of Pharmacy A/p-Kolpewadi Tal- Kopargaon Dist- Ahmednagar invites the application for the following post on for academic year 2024-2025.

| Sr.no | Name of Post | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 01 | Principal | M. Pharmacy. Ph.D. | 01 |
| 02 | Professor/Associate Professor | M. Pharmacy | Each Subject |
| 03 | Assistant Professor | M. Pharmacy / B. Pharmacy | Each Subject |
| 04 | Lecturer (For D. Pharmacy) | All | Each Subject |
| 05 | Lab Technician | D. Pharmacy, B. Pharmacy | 05 |
| 06 | Accountant | M.Com,B.Com | 02 |
| 07 | Clerk | M.Com,B.Com, B.A. | 05 |
| 08 | Peon | 10 th pass | 05 |

1) Qualification, Experience, Scale of Pay & Allowances are applicable as per PCI New Delhi, DBATU Lonere, MSBTE and Govt. of Maharashtra norms.
2) Eligible & Interested candidate fulfilling the qualification and experience may send their applications along with all the details & resume on mail id- drkolpepharmacy @ gmail.com within 15 Days from the Date of Publication of the Advertisement.
3) No T.A/D.A will be provided for the interview.

**President** Dr. Prakash J.Kolpe. 9890641886
Vice President **Dr. Dhananjay P. Kolpe** 9960394648



ऑफर घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी ऑफर

**APPOINTMENT**

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

**आता सवलतीच्या दरात**

| | |
|---|---|
| उत्तर महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ५०००/- |
| मराठवाडा विभाग | रु. ५०००/- |
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ५०००/- |
| विदर्भ | रु. ५०००/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ७५००/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ११५००/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १५५००/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १९५००/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२३ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा **18002081019**
E-mail:customercare@sapp.in


### नीट-यूजीत निष्काळजीपणा...

खंडपीठासमोर नीट-यूजी परीक्षेतील कथित गैरप्रकारांबाबत दाखल नवीन याचिकांवर सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने परीक्षेतील किरकोळ निष्काळजीपणा देखील चुकीचा असल्याचे म्हटले. परीक्षेचे आयोजन करणाऱ्या संस्थेने अशा प्रकरणात खंबीर भूमिका घेतली पाहिजे. जर काही चूक झाली असेल तर ती स्वीकारत कारवाई केली पाहिजे. किमान त्यामुळे संस्थेच्या कामकाजात विश्वास निर्माण होईल, असे खंडपीठ म्हणाले. तसेच याप्रकरणातील नवीन याचिकांवर केंद्र सरकार व एनटीएला दोन आठवड्यांत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. नव्या याचिकांवर प्रलंबित याचिकांसोबत ८ जुलै रोजी सुनावणी केली जाणार आहे. गत आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने परीक्षेतील कथित गैरप्रकारांबाबत सीबीआय चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेवर केंद्र व एनटीएला नोटीस बजावली होती.

यानंतर १३ जून रोजी केंद्र व एनटीएने १,५६३ विद्यार्थ्यांना दिलेले ग्रेसमार्क रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती न्यायालयास दिली होती. या विद्यार्थ्यांना २३ जून रोजी पुन्हा फेरपरीक्षेची संधी दिली जाईल व तो निकाल ३० जून रोजी लागेल, असे सरकारने स्पष्ट केले होते.

### ओबीसी आंदोलन चिघळले

सुरू झाल्याने पोलिसांची धावपळ झाली. आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या, परंतु उपोषणकर्त्यांनी आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केल्यानंतर कार्यकर्ते माघारी फिरले आणि वाहतूक सुरू झाली.

### वसईत प्रेमप्रकरणातून...

असे सांगून त्याने मारहाण करून शिवीगाळ केल्याची तक्रार आरतीने ८ जून रोजी आचोळे पोलीस ठाण्यात दिली होती. यासंदर्भात पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. त्याचवेळी आरतीने त्याच्यावर कारवाई करू नका, असे पोलिसांना सांगितले होते. परंतु आरोपीला १४९ ची नोटीस बजावली होती, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले.

त्यानुसार आचोळे पोलिसांनी पुन्हा असे करणार नाही, असे रोहितकडून वदवून घेतले होते. त्याचा राग मनात धरून मंगळवारी सकाळी तरुणी कामावर जात असताना लोखंडी पान्याच्या सहाय्याने वार करून हत्या केली. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी रोहितला ताब्यात घेतले आहे. रोहितला तिच्याशी लग्न करायचे होते, मात्र तो बेरोजगार असल्यामुळे लग्नाला आरतीच्या घरच्यांचा विरोध होता, असे पोलिसांनी सांगितले.

मृत मुलीची बहीण सानिका हिने आचोळे पोलिसांनी आरोपी रोहितवर कारवाई केली नसून, पैसे घेतल्याचा आरोप केला आहे. मात्र पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ८ जूनला रात्री ११.४५ वाजता तक्रार दाखल करण्यात आली. तसेच आरोपी रोहितवर १४९ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई केली आहे, अशी माहिती आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी दिली आहे.

**समाजातील अनास्था, संवेदनशून्यतेचा गंभीर प्रश्न उभा**

रोहित यादव नामक व्यक्तीने आपल्या प्रेयसी आरती यादवची लोखंडी पान्याने भररस्त्यात केलेली हत्या अतिशय दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या घटनेच्या वेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी होती. दुर्दैवाने कोणीही आरतीला वाचवण्यासाठी पुढे आले नाहीत, उलट लोक व्हिडीओ काढण्यात मग्न होते. एका तरुणाने आरोपीला अडवण्याचा प्रयत्न केला; परंतु तो प्रयत्न निष्फळ ठरला. लोकांनी वेळेवर मदत केली असती तर कदाचित आरतीचे प्राण वाचू शकले असते. या घटनेने समाजातील अनास्था आणि संवेदनशून्यतेचा गंभीर प्रश्न उभा केला आहे. 'झीरो टॉलरन्स टू ऑल टाइप्स ऑफ व्हायोलेन्स अगेन्स्ट विमेन्स' अशी मोहीम हाती घेतली होती. महिलांवरील अत्याचार सहन केले जाणार नाही, यासाठी पोलिसांनी विशेष करून पालघर, कोकण व संपुर्ण महाराष्ट्रात देखील लोक सहभाग वाढून भूमिका घ्यावी, अशी मागणी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना पत्र लिहून केली आहे. बडीकॉप योजनेअंतर्गत सर्वसामान्य नागरिक देखील कॉन्स्टेबलच्या माध्यमातून स्वसंरक्षणासाठी प्रयत्न करू शकतात. लोकांचे धैर्य वाढवून वेळ प्रसंगी ते मदतीला धावले पाहिजेत, यासाठी पोलिसांनी त्यांचा विश्वास वाढवणे गरजेचे आहे. वेळ पडल्यास संरक्षणासाठी महिलांना हत्यार देण्यात यावे, असेदेखील त्या म्हणाल्या.अशा प्रकारच्या घटनांमध्ये दोषींना कठोर शिक्षा होणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये. रोहित यादवने केलेल्या या अमानुष कृत्यासाठी त्याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी आमची मागणी आहे. पीडित मुलीच्या कुटुंबाचे मानसिक समुपदेशन करण्यात यावे तसेच पीडित कुटुंबाला मनोधैर्य योजनेतून तत्काळ मदत करण्यात यावी, असेही गोऱ्हे यांनी म्हटले आहे.

# मुलींच्या मोफत उच्च शिक्षण घोषणेची अंमलबजावणी करण्यात यावी

## मनसेचे नगर शहर सचिव डॉ. संतोष साळवे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अहमदनगर :** राज्य शासनाने मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याच्या घोषणाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नगर शहर सचिव डॉ.संतोष साळवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून मुलींना बारावीनंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी मोफत शिक्षण देण्याची घोषणा राज्य सरकारतर्फे राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ९ फेब्रुवारी २०२४ रोजी जळगावमध्ये केली होती. आता शैक्षणिक वर्षाचे प्रवेश चालू झाले आहेत. तेव्हा उच्च शिक्षण घेर्णाया मुलींना मोफत प्रवेश मिळणार का? याचे उत्तर संस्था चालकांकडे नाही. ते प्रवेश घेणाऱ्या मुलींना सांगतात की, तशा प्रकारचा शासन आदेश आमच्याकडे आलेला नाही. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा आदेश आल्यास त्याची त्वरित अंमलबजावणी केली जाईल. तेव्हा राज्य सरकारने मुलींना मोफत शिक्षण देणारा आदेश त्वरित निर्गमित करावा. म्हणजे घोषणेप्रमाणे ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखांपेक्षा कमी आहे, अशा मुलींना मोफत शिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. मुलींना मोफत शिक्षणाची घोषणा जरी झाली तरी त्यांना शासन निर्णयाची वाट पाहावी लागत आहे. त्यासाठी राज्य सरकारने त्वरित पावले उचलणे गरजेचे आहे.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तेव्हा मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी या घोषणेची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. ही सवलत बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांसाठी आहे. तेव्हा घोषणा जरी झाली तरी शासन निर्णय निर्गमित होणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने आपल्या राज्यातील मुली मोफत उच्च शिक्षण घेऊ शकतील. महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी मोफत उच्च शिक्षणाची घोषणा केली आहे त्याचा शासन निर्णय त्वरित निर्गमित करावा. जेणेकरून या योजनेचा लाभ राज्यातील मुली घेऊन मुलींचे उच्च शिक्षण घेण्याच्या प्रमाणात वाढ होईल, असेही निवेदनात म्हटले आहे.


**नाशिक महानगरपालिका,नाशिक**
**वृक्षप्राधिकरण**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये**

**जाहीर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील पंचवटी विभागाअंतर्गत धोकादायक, वाळलेले व बांधकाम बाधित वृक्ष तोडणे/ पुर्णरोपण करणे/ छाटणी करणे/ वा नाकारणे बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या **हद्दितील नाशिक पंचवटी मनपा मालकीच्या रस्त्याच्या कडेची धोकादायक रहदारीस अडथळा ठरणारी, विद्युत पथदिव्यांना व सिग्नलला अडथळा ठरणारी धोकादायक वृक्षांची छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील ८(२) अन्वये** वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे व वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या वृक्ष तोडणे / छाटणी करणे / पुनर्रोपन करणे वा नाकारणे या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८(३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतरच वृक्ष तोडणे / छाटणी करणे / पुनर्रोपन करणे वा नाकारणे यापैकी जे शक्य असेल त्याबाबतचा प्रस्ताव **मा. वृक्ष प्राधिकरण सभा ठराव ६३९ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये** अहवालासह वृक्ष अधिकारी पंचवटी यांचेमार्फत तयार करणेत येतील. तरी सदरचे अर्ज हे पंचवटी विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्राप्त अर्जांपैकी वृक्ष तोडणे / छाटणी करणे / पुनर्रोपन करणे वा नाकारणे प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात पंचवटी विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत दयाव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

जनसंपर्क/जा.क्र./७०/२०२४
दि.१८/०६/२०२४

मुलगा-मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

**सही/-**
**वृक्ष अधिकारी तथा विभागीय अधिकारी,**
**पंचवटी विभागीय कार्यालय**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**


### मागितली बडीशेप, बसला मार

**छत्रपती संभाजीनगर :** गल्लीतील किराणा दुकानावर जाऊन मला बडीशेपची पुडी मागितली असता,दोघांनी मारहाण केल्याची घटना १७ जून रोजी आंबेडकर चौक परिसरात घडली. सतीश गौणाजी मोकळे, अंकुश गौणाजी मोकळे (रा. आंबेडकर चौक, पिसादेवी रोड) अशी आरोपींची नावे आहेत. संजय नारायण भालेराव (४९ रा. आंबेडकर चौक पिसादेवी रोड) यांनी दिलेल्या फियार्दीनुसार घरासमोरील वैभव किराणा दुकानावर संजय हे त्यांच्या घरासमोरील किराणा दुकानावर बडीशेपची पुडी खाण्यासाठी गेले, त्यांनी बडीशेपची पुडी मागितली असता, सतीश व अंकुश याने त्यांना शिवीगाळ करून बाजूलाच पडलेल्या लाकडी दांड्याने मारहाण केली. त्यात त्यांच्या तोंडावर मार लागल्याने ते जखमी झाले. मारहाण करून दोघे तिथून पळून गेले. याप्रकरणी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

**शाखा कार्यालय :** दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३.

**खाजगी कराराच्या माध्यमातून अचल संपत्तीच्या विक्रीची सूचना**

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८ (८) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या विक्रीची सूचना
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) ने खालील निर्देशित गहाण मालमत्तांच्या विक्रीकरिता काही लिलाव आयोजित केले होते. तथापि, सर्व लिलाव अयशस्वी ठरले. आता, एका इच्छुक खरेदीदाराने आयसीआयसीआय एचएफसीकडे राखीव मूल्याअंतर्गत (कृपया खालील तक्ता पाहा) प्रस्तावासमवेत संपर्क साधला आहे. सर्वसामान्य जनतेस आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालील निर्देशित अचल मालमत्ता या प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे, त्या संपत्तींची खाजगी करारानुसार ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'' व ''जी काही आहे तेथे आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे, ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ. क्र. | कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक | संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास | येणे असलेली रक्कम | राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव | मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| (ए) | (बी) | (सी) | (डी) | (ई) | (एफ) | (जी) |
| १ | छबूराव ठकाजी आढाव (कर्जदार), संगीता छबूराव आढाव (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. : एनएचएडीआर ०००१११७२०९ | फ्लॅट क्र. १०८, पहिला मजला, मधुबन रेसिडेन्सी व गुरुंगण रो-बंगलो, प्लॉट क्र. १, भिंगार कॅम्प, वडारवाडी, सर्व्हे क्र. २ए/४बी, अहमदनगर, महाराष्ट्र-४१४ ००२. | रु. २०,१५,३८१/- दि. १३ जून २०२४ | रु. ५,००,०००/- / रु. ५०,०००/- | २४ जून २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० | ०५ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.०० |
| २ | संगीता छबूराव आढाव (कर्जदार), छबूराव ठकाजी आढाव (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. : एनएचएडीआर ००००१०४९३७५ | फ्लॅट क्र. १०४, पहिला मजला, स्वरानंद अपार्टमेंट, मधुबन नागरदेवळे, ताठी कार्यालयाजवळ, ताईनगर, सर्व्हे क्र. २८१/१ बी, प्लॉट क्र. ९, अहमदनगर, महाराष्ट्र-४१४ ००२ | रु. २४,६५,६९५/- दि. १३ जून २०२४ | रु. ५,००,०००/- / रु. ५०,०००/- | २४ जून २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.०० | ०५ जुलै २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.०० |

आमची ई-लिलाव एजन्सी **ग्लोब टेक**ची वेबसाइट (यूआरएल लिंक- https://BestAuctionDeal.com) वर ऑनलाइन लिलाव आयोजित करण्यात येईल. प्रस्तावित बोलीदारांना **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३** येथे दि. **०५ जुलै २०२४ रोजी दु. ४.००** वाजता वा तत्पूर्वीपर्यंत आरटीजीएस/धनाकर्षाद्वारे (डीडी) (कॉलम ई पाहा) इसारा रक्कम ठेव (इरठे) सादर करणे अनिवार्य असेल व तत्पश्चात त्यांना प्रस्ताव वरील निर्देशित वेबसाइटवर सादर करावा लागेल, ज्यासमवेत इरठेच्या प्रदानाच्या पुराव्यासंदर्भात बँकेकडील डीडीच्या पोचपावतीची स्कॅन केलेली इमेज अपलोड करावी लागेल. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदारांना वेबसाइटच्या माध्यमातून आपले प्रस्ताव सादर करता येऊ न शकल्यास निविदा दस्तावेजांची स्वाक्षरित प्रत **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, दुसरा मजला, कार्यालय क्र. २०३, साई मिडास, पतियाला हाऊसच्या समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर-४१४ ००३** येथे दि. **०५ जुलै २०२४ रोजी सायं. ५.००** वाजता वा तत्पूर्वीपर्यंत सादर करावी. इसारा रक्कम ठेवीचा डीडी/पीओ ही **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. - ऑक्शन** या नावे **अहमदनगर** येथे देय राष्ट्रीयीकृत/शेड्युल्ड बँकेकडील असावी.
सर्वसामान्य जनतेने कृपया त्यांच्या बोली वरील निर्देशित इच्छुक खरेदीदारांद्वारे दिलेल्या रकमेहून अधिक रकमेच्या सादर कराव्यात. वरील निर्देशित इच्छुक खरेदीदारांद्वारे दिलेल्या रकमेहून अधिक रकमेची कोणतीही बोली प्राप्त न झाल्यास, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (८) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत सदर इच्छुक खरेदीदारास गहाण मालमत्तेची विक्री करण्यात येईल.
परीक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरणासंदर्भातील कोणत्याही पुढील स्पष्टीकरणासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांना ०२२-६९९७४३००** किंवा आमचे **सेल्स अॅण्ड मार्केटिंग पार्टनर नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांना संपर्क साधावा.
कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व बोली रद्द करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखून आहे.
विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता कृपया https://www.icicihfc.com येथे भेट द्या.

**दिनांक : १९ जून २०२४**
**ठिकाण : अहमदनगर**

**प्राधिकृत अधिकारी**
**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**


# अलका याज्ञिक यांना दुर्मीळ श्रवण दोष

मुंबा : बॉलीवूडमध्ये अनेक सुपरहिट गाणी गायलेल्या प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना दुर्मीळ श्रवण विकार असल्याचे निदान झाले आहे. आपल्याला 'सेन्सरी न्यूरल नर्व्ह हीअरिंग लॉस' झाल्याचे निदान झाले असल्याची माहिती अलका याज्ञिक यांनी समाज माध्यमांवर दिली. अलका याज्ञिक यांना दोन्ही कानांनी ऐकू येणे बंद झाले आहे. काही आठवड्यांपूर्वी विमानातून उतरताच मला जाणवले की मला काहीही ऐकू येत नाही. या घटनेच्या काही आठवड्यांनंतर थोडी हिंमत एकवटून मी कार्यक्रमांना का जात नाही, असे विचारणाऱ्या माझ्या सर्व मित्र आणि हितचिंतकांसाठी माझे मौन सोडत आहे. माझ्या डॉक्टरांनी मला सांगितले की, व्हायरल अॅटॅकमुळे मला सेन्सरी न्यूरल नर्व्हचा (श्रवणशक्ती कमी होण्याचा) विकार झाला आहे. मला अचानक हा धक्का बसला, असे अलका याज्ञिक यांनी समाज माध्यमांवर म्हटले आहे.

अलका याज्ञिक यांनी आपल्या चाहत्यांना आणि हितचिंतकांना शुभेच्छा पाठवण्याचे आणि प्रार्थना करण्याचे आवाहन केले. त्याचवेळी त्यांनी आपले चाहते आणि सहकारी कलाकारांना मोठ्या आवाजातील संगीतापासून दूर राहण्याचा आणि हेडफोनपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

तुमच्या सर्व प्रेम आणि पाठिंब्याने माझे आयुष्य पुन्हा रुळावर येईल, अशी आशा आहे. मला पुन्हा लवकरच तुमच्यासमोर यायचे आहे. या नाजूक प्रसंगी तुमचा पाठिंबा आणि प्रेम माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. गायक सोनू निगम, शंकर महादेवन, अभिनेत्री पूनम ढिल्लन आणि इला अरुण यांनी अलका याज्ञिक यांना लवकरात लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.


**डॉ. कोळपे नॉलेज सिटी**
मु.पो - कोळपेवाडी, ता- कोपरगाव, जि- अहमदनगर
फोन.९८९०६४१८८६, ९९६०३९४६४८
ई.मेल kdhanesh1984@gmail.com

**प्रवेश....! प्रवेश....! प्रवेश....!**

| Course | Qualification | Year | Code |
|---|---|---|---|
| B. Pharmacy | 12th Sci & MH-CET | 4 Year | 5460 |
| D.Pharmacy | 12th Sci Pass | 2 Year | 5460 |
| B.Sc Nursing | 12th Sci & Nursing CET | 4 Year | 9159 |
| GNM | 12th (Arts, Commerce, Science) Pass | 3 Year | 889, 1151 |
| ANM | 12th (Arts, Commerce, Science) Pass | 2 Year | 810 |

**शिष्यवृत्ती -** * ANM व GNM कोर्ससाठी सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.
* इतर सर्व कोर्सेसाठी आवश्यक सर्व शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.
**वैशिष्टे-** प्रशस्त इमारत, पुस्तकांनी सुसज्ज ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, अद्ययावत संगणक कक्ष, बस सुविधा, हवेशीर व मोकळे वातावरण, प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वृंद

SECRETARY PRESIDENT

संपर्क - ९८९०६४१८८६, ९९६०३९४६४८, ८६००८५१९९९



**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे.**
**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

सत्यमेव जयते | सारथी "शाहू - विचारांना देऊया गती साधुया सर्वांगीण प्रगती"

**बालचित्रवाणी इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, सेनापती बापट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४.**

ई-मेल : sarthiagripune@gmail.com
Website : www.sarthi-maharashtragov.in
'CIN- U74999PN2018NPL17739)
दूरध्वनी क्र. ०२०-२५५९२५०२

जा.क्र. सारथी / कृषी / न.क्र.७२/१०९८/२०२४ दिनांक : १४/०६/२०२४

**CALL FOR CANDIDATE ONLINE APPLICATION**

**CHHATRAPATI SHAHU MAHARAJ RESEARCH TRAINING AND HUMAN DEVELOPMENT INSTITUTE (SARTHI) PUNE and VASANTDADA SUGAR INSTITE PUNE-IFAT and WBAT COURSES SPONSORSHIP - 2024**

**उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील, शैक्षणिक संधी लक्षित गटातील इच्छुक पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील इच्छुक पात्र उमेदवारांकडून वसंतदादा साखर संस्था, पुणे यांचेकडील खालील कोर्सेस करिता सारथी प्रायोजकत्व (स्पॉनसरशीप)- २०२४ साठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कोर्सचे नाव-**

1) Industrial Fermentation And Alcohol Technology (Post Graduate Diloma Courses.)
2) M.Sc. Wine Brewing and Alcohol Technology (Post Graduate Course)

वसंतदादा साखर संस्था, पुणे यांचेकडे प्रवेश घेणेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारिख ३०.६.२०२४ आहे. इच्छुक उमेदवारांनी दि. ३०/६/२०२४ पूर्वी वसंतदादा साखर संस्थेकडे अर्ज सादर करावा. तथापि, आवश्यक निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवार विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेनंतर सारथी प्रायोजकत्व **(Sponsorship)** साठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज दि.३०/११/२०२४ पूर्वी सारथीकडे सादर करावा.

अधिक माहितीसाठी व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी निकष, अटी शर्ती करिता सारथी, पुणे या संकेतस्थळावरील सूचना फलक लिंक www.sarthi-maharashtragov.in सूचना फलक Sarthi VSI-IFAT & WBAT Courses 2024 Sponsorship Application Form पहावी.

**सारथी प्रायोजकत्व (Sponsorship) साठी दिनांक ३०/११/ २०२४ पूर्वी अर्ज करावा.**
**याविषयी कोणतीही नवीन माहिती / सूचना यापुढे केवळ सारथी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

सही
(श्री. अशोक काकडे) भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे.

डीजीआयपीआर/२०२४-२५/क्र-५/C-२९१